0 3 SEP 2026
तरुण भारत

डॉ. भालचंद्र मुणगेकर यांचे प्रतिपादन : शिवाजी विद्यापीठात वि. स. खांडेकर सुवर्ण स्मृतीवर्ष सांगता समारंभ

# वि. स. खांडेकर मानवी जीवनाचे भाष्यकार

**वि. स. खांडेकरांच्या साहित्यातून उपभोगवाद, पुरुषप्रधान मानसिकता आणि मानवी वासनेचा संघर्ष, प्रेम, त्याग, नैतिकता आणि हिंसेविषयीची भूमिका आजच्या समाजातील अनेक प्रश्नांशी थेट संवाद साधतात. खांडेकर केवळ अलंकारिक भाषेचे साहित्यिक नव्हते, तर मानवी जीवनाचे भाष्यकार होते, असे प्रतिपादन ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ व विचारवंत डॉ. भालचंद्र मुणगेकर यांनी केले.**

त. भा. प्रतिनिधी



कोल्हापूर : कार्यक्रमात बोलताना डॉ. भालचंद्र मुणगेकर सोबत प्र-कुलगुरु डॉ. ज्योती जाधव, डॉ. रणधीर शिंदे, सुचेता कोरगांवकर, डॉ. सुनीलकुमार लवटे, डॉ. माणिकराव साळुंखे, डॉ. अतुल कापडी.

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचा मराठी अधिविभाग आणि आंतरभारती शिक्षण मंडळ, कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित वि. स. खांडेकर सुवर्ण स्मृतिवर्षाच्या सांगता समारंभात ते बोलत होते. 'वि. स. खांडेकर : सुवर्ण स्मरण' या विषयावर त्यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरु डॉ. ज्योती जाधव होत्या. आंतरभारती शिक्षण मंडळाच्या अध्यक्षा सुचेता कोरगावकर, माजी कुलगुरू डॉ. माणिकराव साळुंखे, डॉ. सुनीलकुमार लवटे, खांडेकरांचे नातू डॉ. अतुल कापडी प्रमुख उपस्थित होते.

डॉ. मुणगेकर म्हणाले, जीवनात निर्मळता, सुसंस्कृतपणा, ध्येयनिष्ठा व शोषणमुक्त समाज निर्माण व्हावा, हे त्यांच्या साहित्यामागील मूलभूत स्वप्न होते. त्यामुळे त्यांच्या साहित्याची प्रासंगिकता काळाच्या पुढेही टिकून राहिली आहे. नव्या पिढीने खांडेकरांना केवळ अभ्यासक्रमापुरते न पाहता त्यांच्या साहित्याचा नव्याने शोध घेण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले. डॉ. मुणगेकर यांनी खांडेकरांच्या विविध साहित्यकृतींच्या आधारे त्यांच्या लेखनातील मानवी जीवनाचा व्यापक पट उलगडला.

माजी कुलगुरू डॉ. माणिकराव साळुंखे यांनी खांडेकरांचे साहित्य हे केवळ एका पिढीपुरते मर्यादित नसून आजच्या कृत्रिम बुद्धिमत्ता आणि तंत्रज्ञानाच्या युगातही तितकेच महत्त्वाचे असल्याचे सांगितले. ज्येष्ठ विचारवंत डॉ. सुनीलकुमार लवटे यांनी वि. स. खांडेकर यांचे शिवाजी विद्यापीठाशी स्थापनेपासूनच अतूट नाते राहिले असल्याचे सांगितले. प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांनी कृत्रिम बुद्धिमत्तेच्या युगातही साहित्यिकांच्या प्रत्यक्ष विचारांतून आणि अनुभवांतून मिळणाऱ्या संस्कारांचे महत्त्व अधोरेखित केले.

सुचेता कोरगावकर आणि डॉ. अतुल कापडी यांनीही खांडेकरांविषयीच्या आठवणींना उजाळा दिला. मराठी अधिविभागाचे प्रमुख डॉ. रणधीर शिंदे यांनी स्वागत केले. प्रांजली क्षीरसागर यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. सुखदेव एकल यांनी आभार मानले. यावेळी डॉ. शरद नावरे, बी. एस. पाटील, डॉ. पी. एम. हिर्डेकर, डॉ. प्रवीण चौगुले, डॉ. अनिल गवळी, चंद्रकांत पोतदार, तनुजा शिपूरकर, डॉ. आर. जी. कुलकर्णी, डॉ. सागर देशपांडे आदी उपस्थित होते.

**विशेषांकांचे प्रकाशन**

दिवसभरात झालेल्या सत्रांमध्ये पुणे येथील प्रा. मिलिंद जोशी व ज्येष्ठ पत्रकार डॉ. विजय चोरमारे यांच्या प्रमुख उपस्थितीत 'वि.स. खांडेकर यांचे असंग्रहित लेखन व त्यांच्याविषयीचे ग्रंथ' या विषयीचे सत्र पार पडले. अध्यक्षस्थानी कुलसचिव डॉ. विलास शिंदे होते. या सत्रात वि.स. खांडेकर लिखित वृंदावन (कादंबरी), आगरकर चरित्र, स्मृतींची चाळता पाने (संकीर्ण), अर्घ्यदान (काव्यसंग्रह प्रस्तावना) या ग्रंथांसह आंतरभारती: उगम आणि विकास (लेखक- डॉ. सुनीलकुमार लवटे), कुमारांसाठी वि.स. खांडेकर (ले. नीलम माणगावे), वि.स. खांडेकर: साहित्यिक आणि माणूस (ले. राम देशपांडे), वि.स. खांडेकर चरित्र (ले. डॉ. लवटे), वि.स. खांडेकर: एक ध्येयवादी शिक्षक (ले. जया दडकर) या पुस्तकांचेही प्रकाशन झाले. त्याचबरोबर साप्ताहिक साधना, दक्षिण महाराष्ट्र साहित्य पत्रिका, जडण-घडण, मेहता ग्रंथजगत या नियतकालिकांच्या खांडेकर सुवर्ण स्मृतिवर्ष विशेषांकाचेही प्रकाशन करण्यात आले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

03 SEP 2026

सकाळ

# खांडेकरांच्या साहित्याचा नव्याने शोध घ्यावा

## डॉ. भालचंद्र मुणगेकर : शिवाजी विद्यापीठात वि. स. खांडेकर सुवर्ण स्मृती वर्षाची सांगता

■ सकाळ वृत्तसेवा

**कोल्हापूर, ता. २ : वि. स. खांडेकर यांच्या साहित्याचा गाभा मानवी जीवनाच्या सार्वकालिक प्रश्नांशी जोडलेला आहे. त्यामुळे नव्या पिढीने खांडेकरांना केवळ अभ्यासक्रमापुरते न पाहता त्यांच्या साहित्याचा नव्याने शोध घेण्याची गरज आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ व ज्येष्ठ विचारवंत डॉ. भालचंद्र मुणगेकर यांनी आज केले.**

शिवाजी विद्यापीठ मराठी अधिविभाग आणि अंतरभारती शिक्षण मंडळातर्फे वि. स. खांडेकर सुवर्ण स्मृती वर्षाच्या सांगता कार्यक्रमात 'वि. स. खांडेकर : सुवर्ण स्मरण' या विषयावरील विशेष स्मृती व्याख्यानात ते बोलत होते.

अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, तर अंतरभारती शिक्षण मंडळाच्या अध्यक्षा सुचेता कोरगावकर, माजी कुलगुरू डॉ. माणिकराव साळुंखे, ज्येष्ठ साहित्यिक डॉ. सुनीलकुमार लवटे, खांडेकरांचे नातू डॉ. अतुल कापडी आदी प्रमुख उपस्थित होते.

विद्यार्थ्यांच्या हातात केवळ पदवी नव्हे, तर विचार केवळ कौशल्य नव्हे, तर विवेक आणि रोजगारासाठीच नव्हे, तर जीवनासाठी शिक्षण देणे, हीच खऱ्या अर्थाने खांडेकरांना आदरांजली ठरेल, असे डॉ. मुणगेकर यांनी नमूद केले.

डॉ. साळुंखे यांनी खांडेकरांचे साहित्य आजच्या कृत्रिम बुद्धिमत्ता, तंत्रज्ञानाच्या युगातही महत्त्वाचे असल्याचे सांगितले. विद्यापीठाने साकारलेले खांडेकरांचे स्मृती संग्रहालय म्हणजे विद्यापीठाने खांडेकरांविषयी जपलेल्या आदरभावाचेच प्रतीक असल्याचे डॉ. लवटे यांनी सांगितले.

मराठी अधिविभागाचे प्रमुख डॉ. रणधीर शिंदे, शरद नावरे, बी. एस. पाटील, डॉ. बी. एम. हिर्डेकर, प्रवीण चौगुले, अनिल गवळी, चंद्रकांत पोतदार, ऋतुजा शिपूरकर, आर. जी. कुलकर्णी, सागर देशपांडे, प्रांजली क्षीरसागर, सुखदेव एकल आदी उपस्थित होते.



शिवाजी विद्यापीठ : वि. स. खांडेकर सुवर्ण स्मृती वर्ष सांगता कार्यक्रमात बोलताना ज्येष्ठ विचारवंत डॉ. भालचंद्र मुणगेकर, यावेळी डावीकडून रणधीर शिंदे, सुचेता कोरगावकर, ज्योती जाधव, सुनीलकुमार लवटे, माणिकराव साळुंखे, अतुल कापडी आदी.

### खांडेकरांविषयी ग्रंथचर्चा, विशेषांकांचे प्रकाशन

■ पुणे येथील प्रा. मिलिंद जोशी, ज्येष्ठ पत्रकार डॉ. विजय चोरमारे यांच्या प्रमुख उपस्थितीत 'वि. स. खांडेकर यांचे असंग्रहित लेखन व त्यांच्याविषयीचे ग्रंथ' या विषयीचे सत्र झाले. अध्यक्षस्थानी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे होते. या सत्रात वि. स. खांडेकर लिखित वृंदावन, आगरकर चरित्र, स्मृतीची चाळता पाने, अर्ध्यदान, अंतरभारती : उगम आणि विकास, कुमारांसाठी वि. स. खांडेकर, वि. स. खांडेकर : साहित्यिक आणि माणूस, वि. स. खांडेकर चरित्र, वि. स. खांडेकर : एक ध्येयवादी शिक्षक या पुस्तकांसह विविध नियतकालिकांच्या खांडेकर सुवर्ण स्मृतिवर्ष विशेषांकांचे प्रकाशन करण्यात आले.

03 SEP 2026
पुण्यनगरी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# बदलत्या सामाजिक परिस्थितीतही खांडेकरांचे साहित्य प्रस्तुत

। कोल्हापूर : प्रतिनिधी

मानवी जीवनातील नैतिक द्वंद्व, स्त्री-पुरुष संबंध, सामाजिक विषमता, शिक्षणाचे उद्दिष्ट आणि शोषणमुक्त समाजाची आकांक्षा यांचा वेध घेणारे वि. स. खांडेकरांचे साहित्य आजच्या बदलत्या सामाजिक परिस्थितीतही तितकेच प्रस्तुत आहे. त्यांच्या साहित्याचा गाभा मानवी जीवनाच्या सार्वकालिक प्रश्नांशी जोडलेला असल्याने नव्या पिढीने खांडेकरांना केवळ अभ्यासक्रमापुरते न पाहता त्यांच्या साहित्याचा नव्याने शोध घेण्याची गरज आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ व विचारवंत डॉ. भालचंद्र मुणगेकर यांनी केले.



शिवाजी विद्यापीठाचा मराठी अधिविभाग आणि आंतरभारती शिक्षण मंडळ, कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित वि. स. खांडेकर सुवर्ण स्मृतिवर्षाच्या सांगता समारंभात 'वि. स. खांडेकर : सुवर्ण स्मरण' या विषयावर विशेष स्मृती व्याख्यान देताना ते बोलत होते.

खांडेकरांच्या 'ययाती'ची आजची प्रस्तुतता १९६० च्या दशकापेक्षाही अधिक असल्याचे सांगताना डॉ. मुणगेकर यांनी 'क्रौंचवध'मधील दिनकर-सुलोचना यांच्या नात्यातून शारीरिक वासनेपलीकडील आंतरिक प्रेम, तर 'ययाती'मधून पुरुषप्रधान व्यवस्थेतील स्त्रीच्या शोषणाचे टोकदार चित्रण खांडेकरांनी केले असल्याचे नमूद केले.

माजी कुलगुरू डॉ. माणिकराव साळुंखे म्हणाले, तंत्रज्ञानामुळे माणूस सामर्थ्यवान झाला असला तरी तो अधिक 'माणूस' झाला आहे का, हा प्रश्न आज विचारण्याची गरज असून, खांडेकरांच्या साहित्याचा केंद्रबिंदू असलेली माणुसकी, नैतिकता, संवेदना, सामाजिक बांधिलकी आणि जीवनदृष्टी आजच्या पिढीला दिशादर्शक ठरू शकते.

ज्येष्ठ विचारवंत डॉ. सुनीलकुमार लवटे म्हणाले, विद्यापीठाच्या पहिल्या अधिसभेचे राज्यपाल नियुक्त सदस्य म्हणून खांडेकरांनी प्रारंभीच्या काळात विद्यापीठाला मार्गदर्शन केले. ज्ञानपीठ पुरस्कारानंतर त्यांना मानद डी.लिट. पदवी देणारे महाराष्ट्रातील शिवाजी विद्यापीठ हे एकमेव विद्यापीठ ठरले.

अध्यक्षीय मनोगतात प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव म्हणाल्या, खांडेकरांच्या साहित्यात केवळ एका पिढीला नव्हे, तर पुढील पिढ्यांनाही घडवण्याची क्षमता असल्याने अशा साहित्यिकांच्या विचारांशी विद्यार्थ्यांचा प्रत्यक्ष संवाद घडवणारे कार्यक्रम सातत्याने होत राहणे आवश्यक आहे.

यावेळी आंतरभारती शिक्षण मंडळाच्या अध्यक्षा सुचेता कोरगावकर आणि खांडेकरांचे नातू डॉ. अतुल कापडी यांनीही खांडेकरांविषयीच्या आठवणींना उजाळा दिला. खांडेकरांविषयी ग्रंथचर्चा व विशेषांकांचे प्रकाशन करण्यात आले. मराठी अधिविभागाचे प्रमुख डॉ. रणधीर शिंदे यांनी प्रास्ताविक केले. प्रांजली क्षीरसागर यांनी सूत्रसंचालन केले, तर डॉ. सुखदेव एकल यांनी आभार मानले.

कार्यक्रमाला डॉ. शरद नावरे, बी. एस. पाटील, डॉ. बी. एम. हिर्डेकर, डॉ. प्रवीण चौगुले, डॉ. अनिल गवळी, चंद्रकांत पोतदार, तनुजा शिपूरकर, डॉ. आर. जी. कुलकर्णी, डॉ. सागर देशपांडे आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

03 SEP 2026

जनप्रवास

# नव्या पिढीने खांडेकरांच्या साहित्याचा शोध घेण्याची गरज

## डॉ. भालचंद्र मुणगेकर यांचे प्रतिपादन

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

मानवी जीवनातील नैतिक द्वंद्व, स्त्री-पुरुष संबंध, सामाजिक विषमता, शिक्षणाचे उद्दिष्ट आणि शोषणमुक्त समाजाची आकांक्षा यांचा वेध घेणारे, वि. स. खांडेकरांचे साहित्य आजच्या बदलत्या सामाजिक परिस्थितीतही तितकेच प्रस्तुत आहे. त्यांच्या साहित्याचा गाभा मानवी जीवनाच्या सार्वकालिक प्रश्नांशी जोडलेला असल्याने नव्या पिढीने खांडेकरांना केवळ अभ्यासक्रमापुरते न पाहता त्यांच्या साहित्याचा नव्याने शोध घेण्याची गरज आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ व विचारवंत डॉ. भालचंद्र मुणगेकर यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या मराठी अधिविभाग आणि आंतरभारती शिक्षण मंडळ, कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित वि. स. खांडेकर सुवर्ण स्मृतिवर्षाच्या सांगता



समारंभात 'वि. स. खांडेकर : सुवर्ण स्मरण' या विषयावर विशेष स्मृती व्याख्यान देताना ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव होत्या.

डॉ. मुणगेकर म्हणाले, खांडेकरांच्या साहित्यातून उपभोगवाद, पुरुषप्रधान मानसिकता आणि मानवी वासनेचा संघर्ष, प्रेम, त्याग, नैतिकता आणि हिंसेविषयीची भूमिका आजच्या समाजातील अनेक प्रश्नांशी थेट संवाद साधते. खांडेकर केवळ अलंकारिक भाषेचे साहित्यिक नव्हते, तर मानवी जीवनाचे भाष्यकार होते. जीवनात निर्मळता, सुसंस्कृतपणा, ध्येयनिष्ठा आणि शोषणमुक्त समाज निर्माण व्हावा, हे त्यांच्या साहित्यामागील मूलभूत स्वप्न होते. त्यामुळे त्यांच्या साहित्याची प्रासंगिकता काळाच्या पुढेही टिकून राहते.

माजी कुलगुरू डॉ. माणिकराव साळुंखे म्हणाले, तंत्रज्ञानामुळे माणूस अधिक सामर्थ्यवान झाला असला, तरी तो अधिक 'माणूस' झाला आहे का, हा प्रश्न आज विचारण्याची गरज असून खांडेकरांच्या साहित्याचा केंद्रबिंदू असलेली माणुसकी, नैतिकता, संवेदना, सामाजिक बांधिलकी आणि जीवनदृष्टी आजच्या पिढीला दिशादर्शक ठरू शकते. ज्येष्ठ विचारवंत डॉ. सुनीलकुमार लवटे म्हणाले, विद्यापीठाच्या पहिल्या अधिसभेचे राज्यपाल नियुक्त सदस्य म्हणून खांडेकरांनी प्रारंभीच्या काळात विद्यापीठाला मार्गदर्शन केले, तर ज्ञानपीठ पुरस्कारानंतर त्यांना मानद डी.लिट. पदवी देणारे महाराष्ट्रातील शिवाजी विद्यापीठ हे एकमेव विद्यापीठ ठरले. शिवाजी विद्यापीठाने साकारलेले खांडेकरांचे स्मृती संग्रहालय म्हणजे विद्यापीठाने खांडेकरांविषयी जपलेल्या आदरभावाचेच प्रतीक आहे.

अध्यक्षस्थानावरून प्र-कुलगुरू डॉ. जाधव म्हणाल्या, आज माहिती आणि भाषणे काही क्षणांत कृत्रिम बुद्धिमत्तेच्या माध्यमातून उपलब्ध होत असली, तरी प्रत्यक्ष दिग्गज साहित्यिकांचे विचार ऐकताना मिळणारा भावनिक आणि मानवी स्पर्श कृत्रिम बुद्धिमत्तेला पर्याय ठरू शकत नाही. खांडेकरांच्या साहित्यात केवळ एका पिढीला नव्हे, तर पुढील पिढ्यांनाही घडविण्याची क्षमता असल्याने अशा साहित्यिकांच्या विचारांशी विद्यार्थ्यांचा प्रत्यक्ष संवाद घडविणारे कार्यक्रम सातत्याने होत राहणे आवश्यक आहे.

सुचेता कोरगावकर आणि डॉ. अतुल कापडी यांनीही खांडेकरांविषयीच्या आठवणींना उजाळा दिला. मराठी अधिविभागाचे प्रमुख डॉ. रणधीर शिंदे यांनी स्वागत, प्रास्ताविक व परिचय करून दिला. प्रांजली क्षीरसागर यांनी सूत्रसंचालन केले, तर डॉ. सुखदेव एकल यांनी आभार मानले. यावेळी डॉ. शरद नावरे, बी.एस. पाटील, डॉ. बी.एम. हिर्डेकर, डॉ. प्रवीण चौगुले, डॉ. अनिल गवळी, चंद्रकांत पोतदार, तनुजा शिपूरकर, डॉ. आर.जी. कुलकर्णी, डॉ. सागर देशपांडे यांच्यासह शिक्षक, आदी उपस्थित होते.

03 SEP 2026
तरुण भारत

# विद्यार्थ्यांसाठी सेट, नेट परीक्षेला महत्त्व

प्रतिनिधी,कोल्हापूर

- डॉ. ज्योती जाधव :
- शिवाजी विद्यापीठात दुरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्रातर्फे मार्गदर्शन कार्यशाळा

विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक जीवनात सेट, नेट परीक्षेला अमूल्य महत्त्व आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाच्या प्र–कुलगुरू प्रा. डॉ. ज्योती जाधव यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या वतीने दि. १ ते ५ रोजी दरम्यान आयोजित सेट परीक्षा ऑनलाईन मार्गदर्शन कार्यशाळेच्या उद्‌घाटनप्रसंगी प्रसंगी त्या बोलत होत्या. यावेळी कुलसचिव डॉ.विलास शिंदे व संचालक प्रा.डॉ. प्रतिभा पाटणकर यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यशाळेच्या पहिल्या दिवशीच्या सत्रांमध्ये सेट परीक्षेचे स्वरूप, अभ्यासक्रम, प्रश्नपत्रिकेचे स्वरूप, प्रश्न सोडविण्याच्या पद्धती, वेळेचे नियोजन, संदर्भ साहित्यावर माहिती दिली. पेपर–१ मधील माहिती विश्लेषण या विषयावर डॉ. शशिकांत अन्नंदाते, संशोधन अभियोग्यता या विषयावर डॉ. डॉ. कृष्णा पाटील, अध्यापन अभियोग्यता या विषयावर डॉ. शशिकांत अन्नदाते आणि गणितीय युक्तिवाद आणि अभियोग्यता या विषयावर डॉ. मारुती लोंढे यांनी मार्गदर्शन केले. डॉ. सचिन भोसले यांनी सूत्रसंचालन केले. उपकुलसचिव विनय शिंदे यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
0 3 SEP 2026

सकाळ

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'डॉ. जे. पी. नाईक आदर्श शिक्षक पुरस्कार प्राचार्य कुंभार, कणसे यांना जाहीर

## डॉ. पाटील, माळी यांचाही समावेश; उच्च व तंत्रशिक्षण विभागाकडून सन्मान

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. २ : राज्य शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाने आज डॉ. जे. पी. नाईक आदर्श राज्य शिक्षक पुरस्कार जाहीर केले. त्यात शिवाजी विद्यापीठ कार्यक्षेत्रातील कोल्हापूरमधील प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, प्रा. डॉ. अरुण पाटील आणि सांगलीमधील प्राचार्य डॉ. धनाजी कणसे, प्रा. गजानन माळी यांची या पुरस्कारांसाठी निवड झाली.

राज्यातील महाविद्यालये, विद्यापीठ, अभियांत्रिकी, कला शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या ३१ प्राचार्य, प्राध्यापकांना दरवर्षी उच्च व तंत्रशिक्षण विभागातर्फे या पुरस्काराने सन्मानित केले जाते. या विभागाने आज २०२४-२५ आणि २०२५-२६ या दोन वर्षांचे पुरस्कार जाहीर केले. त्यात यंदाच्या प्राचार्य संवर्गातील पुरस्कारासाठी निवड झालेले प्राचार्य डॉ. कुंभार सध्या कोपार्डे (ता. करवीर) येथील स. ब. खाडे महाविद्यालयात कार्यरत आहेत.



डॉ. धनाजी कणसे



आर. आर. कुंभार



प्रा. अरुण पाटील



गजानन माळी

गेल्यावर्षीचा पुरस्कार जाहीर झालेले प्राचार्य डॉ. कणसे हे भारती विद्यापीठाच्या मातोश्री बयाबाई श्रीपतराव कदम महाविद्यालय, कडेगावमध्ये कार्यरत आहेत. कोल्हापुरातील महावीर महाविद्यालयातील प्रा. पाटील यांना मागील वर्षीचा, तर सांगलीतील डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयाचे प्रा. माळी यांना यावर्षीचा पुरस्कार जाहीर झाला आहे रोख २५ हजार रुपये, शाल-श्रीफळ, मानपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. पाच सप्टेंबरला शिक्षकदिनी वितरण होणार आहे.

0 3 SEP 2026

पुढारी


डॉ. धनाजी कणसे


डॉ. अरुण पाटील


डॉ. आर. आर. कुंभार


डॉ. गजानन माळी

# प्राचार्य डॉ. कणसे, डॉ. पाटील, डॉ. कुंभार, डॉ. माळी यांना राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

राज्य सरकारच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागातर्फे डॉ. जे. पी. नाईक आदर्श राज्य शिक्षक पुरस्कार घोषित केले.

२०२४ ते २०२५ या वर्षासाठी सांगली येथील डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. धनाजी कणसे, कोल्हापुरातील महावीर महाविद्यालयातील प्रा. डॉ. अरुण पाटील यांना जाहीर झाले. तर २०२५ ते २०२६ या वर्षासाठी कोपार्डे (ता. करवीर) येथील स. ब. खाडे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार व डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयीतल प्रा. डॉ. गजानन माळी यांना जाहीर झाले. उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे सचिव डॉ. श्रीकांत पुलकुंडवार यांनी ही घोषणा केली. दरवर्षी शिक्षक दिनाच्या औचित्याने राज्यस्तरीय निवड समितीच्या वतीने या पुरस्कारासाठी निवड केली जाते. रोख २५ हजार रुपये, शाल, श्रीफळ व प्रमाणपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

03 SEP 2026

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ४२ प्राचार्य-शिक्षकांना डॉ. जे. पी. नाईक आदर्श शिक्षक पुरस्कार

## डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयातील प्रा. डॉ. गजानन माळी यांचा समावेश

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई :** राज्यातील महाविद्यालयीन, विद्यापीठ, अभियांत्रिकी, तंत्र शिक्षण आणि कला शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या प्राचार्य व शिक्षकांना दिला जाणारा 'डॉ. जे. पी. नाईक आदर्श राज्य शिक्षक पुरस्कार' उच्च व तंत्र शिक्षण विभागाने बुधवारी जाहीर केला. वर्ष २०२४-२५ साठी २०, तर वर्ष २०२५-२६ साठी २२ शिक्षकांना हे पुरस्कार जाहीर झाले आहेत. त्यामध्ये सांगलीतील डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयातील प्रा. डॉ. गजानन माळी, मुंबईतील एस. एन. डी. टी. महिला विद्यापीठातील प्रा. विरेंद्र नगराळे, व्हीजेटीआयमधील डॉ. नितीन परशराम गुल्हाणे यांचा २०२५-२०२६ च्या पुरस्कारासाठी जाहीर झालेल्या शिक्षकांचा समावेश आहे.



प्रा. डॉ. गजानन माळी

उच्च शिक्षण, तंत्र शिक्षण, अभियांत्रिकी, औषधनिर्माण आणि कला शिक्षण क्षेत्रात कार्यरत प्राचार्य व शिक्षकांच्या योगदानाचा राज्यस्तरावर गौरव करण्यासाठी दरवर्षी हे पुरस्कार दिले जातात. गेल्या दोन वर्षासाठी प्रलंबित असलेली पुरस्कार निवड प्रक्रिया पूर्ण झाल्याने आता निवड झालेल्या शिक्षकांना पुरस्कार प्रदान करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. त्यात दोन वर्षांसाठी मिळून राज्यभरातील ४२ जणांची पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे.

राज्यातील विद्यापीठे आणि संबंधित महाविद्यालयांमधील प्राचार्य व शिक्षकांचे प्रस्ताव मागविण्यात आले होते. संचालक आणि विद्यापीठ स्तरावर छाननी झाल्यानंतर पात्र प्रस्ताव केंद्रीय छाननी समितीकडे पाठविण्यात आले. ५० पेक्षा कमी गुण मिळालेल्या प्रस्तावांना निवडीतून वगळण्यात आले. त्यानंतर पात्र प्रस्ताव राज्यस्तरीय निवड समितीकडे पाठविण्यात आले. त्यातून या शिक्षकांची पुरस्कारासाठी निवड केली आहे.

### मुंबई विभागात पुरस्काराचे मानकीर ठरलेले शिक्षक / प्राध्यापक

| वर्ष २०२४-२५ | पुरस्कारार्थी |
|---|---|
| शिक्षक संवर्ग - प्रा. डॉ. सुरेश शेंडगे | विनायक गणेश वझे कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, मुलुंड |
| **अभियांत्रिकी व औषधनिर्माण शिक्षण** | |
| डॉ. विकास फल्ले | व्हीजेटीआय, मुंबई |
| डॉ. स्वाती पाटील | के. एम. कुंदनानी कॉलेज ऑफ फार्मसी, मुंबई. |
| **वर्ष २०२५-२६ : शिक्षक संवर्ग :** | **पुरस्कारार्थी** |
| प्रा. विरेंद्र नगराळे | एस. एन. डी. टी. महिला विद्यापीठ, मुंबई. |
| **अभियांत्रिकी व औषधनिर्माण शिक्षण** | |
| डॉ. नितीन गुल्हाणे | व्हीजेटीआय, मुंबई |

0 3 SEP 2026
सकाळ

जनसंपर्क कक्ष
वाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# खेळाडू, प्रशिक्षकांच्या भत्त्यात दुप्पट वाढ

## शिवाजी विद्यापीठाचा निर्णय; रक्कम थेट बँक खात्यावर जमा होणार

■ सकाळ वृत्तसेवा

**कोल्हापूर, ता. २ : शिवाजी विद्यापीठाने विविध क्रीडा स्पर्धांमध्ये विद्यापीठातर्फे सहभागी होणाऱ्या खेळाडू आणि त्यांच्यासोबत जाणाऱ्या प्रशिक्षकांच्या भत्त्यात दुप्पट वाढ केली आहे. आतापर्यंत प्रतिदिन ३५० रुपये मिळणारा भत्ता आता ७०० रुपये केला आहे. त्यामुळे त्यांना स्पर्धांच्या कालावधीत होणाऱ्या दैनंदिन खर्चासाठी मोठा आधार मिळणार आहे.**

या भत्त्यामध्ये २०१९ नंतर यावर्षी म्हणजे तब्बल सात वर्षांनंतर वाढ झाली आहे. विद्यापीठाचे प्रतिनिधित्व करण्यासाठी दरवर्षी राज्य, राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांमध्ये सहभागी होणाऱ्या सुमारे ८५० खेळाडू आणि ८० हून अधिक प्रशिक्षकांना दैनंदिन स्थानिक भत्ता ११० ते ३५० रुपयांपर्यंत मिळत होता; पण वाढती महागाई, प्रवास, निवास आणि दैनंदिन खर्च लक्षात घेता ही रक्कम अपुरी पडत होती. त्यावर अधिसभा सदस्य श्वेता परळेकर यांनी २७ डिसेंबर २०२४ रोजी झालेल्या अधिसभेच्या बैठकीत खेळाडूंना स्पर्धा, सराव शिबिराच्या कालावधीत मिळणारा दैनंदिन भत्ता वाढवून ७०० रुपये करण्याचा ठराव मांडला. त्यानुसार सिनेटने ठराव मंजूर करून संबंधित अधिकार मंडळाकडे शिफारस केली.

याबाबत आणखी दोनवेळा ठराव झाले, तरी त्याची अंमलबजावणी झाली नव्हती. त्याकडे 'सकाळ'ने १४ जुलै २०२६ रोजी 'तीनदा ठराव मंजूर, तरीही भत्ता वाढेना' या वृत्तातून लक्ष वेधले होते. त्याची दखल घेत कुलगुरूंनी सकारात्मक कार्यवाही केली. भत्तावाढीच्या ठरावाची अंमलबजावणी तातडीने करण्याचा आदेश प्रशासनाला दिला. त्यानुसार आता खेळाडूंना ७००, तर प्रशिक्षकांना ६३० रुपये भत्ता मिळणार आहे. भत्त्याची रक्कम त्यांच्या बँक खात्यावर जमा केली जाणार आहे.




गेल्या दीड वर्षांपासून प्रलंबित असलेल्या भत्तावाढीचा प्रश्न कुलगुरूंनी सकारात्मक भूमिकेतून सोडविला. 'विद्यार्थिकेंद्री प्रशासनाची ओळख' या मूल्याची त्यांनी कृतीतून जपणूक केली आहे. भविष्यातही अशाच निर्णयक्षम, संवेदनशील भूमिकेतून विद्यार्थीहिताचे प्रश्न मार्गी लागतील, अशी अपेक्षा आहे.
**- श्वेता परळेकर**, सिनेट सदस्य

### खेळाडूंची धावपळ थांबणार

■ एखाद्या स्पर्धेला जाण्यासाठी खेळाडूंना रेल्वे, बसच्या तिकिटाचे आरक्षण स्वतः करावे लागत होते. त्यासाठी त्यांची धावपळ व्हायची. आता ती थांबणार आहे. विद्यापीठाच्या टुरिझम अँड ट्रॅव्हल अभ्यासक्रम राबविणाऱ्या विभागाकडे या खेळाडू, प्रशिक्षकांच्या तिकिटाच्या आरक्षणाची जबाबदारी सोपविण्याचा निर्णय विद्यापीठाने घेतला असल्याचे क्रीडा अधिविभागाचे संचालक डॉ. शरद बनसोडे यांनी सांगितले.

शिवाजी विद्यापीठातील खेळाडू विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता व त्यांच्या मेहनतीला योग्य पाठबळ मिळावे, या उद्देशाने आम्ही त्यांच्या महागाई भत्त्यात (डीए) वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. कोल्हापूरच्या मातीत घडलेल्या ऑलिंपिकवीर खाशाबा जाधव यांच्या प्रेरणेतून आजच्या खेळाडूंनी अधिक जिद्द, आत्मविश्वासाने राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावर चमकावे आणि विद्यापीठासह राज्याचे नाव उज्ज्वल करावे, हेच स्वप्न घेऊन आम्ही वाटचाल करत आहोत.
**- डॉ. आर. के. कामत**, कुलगुरू

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

तरुण भारत
03 SEP 2026

लक्षवेधी

'आजीवन शिक्षण व विस्तार विभाग' ठरतोय समाजाभिमुख शिक्षणाचा प्रभावी सेतू

# विद्यापीठ-समाजातील दुवा : लोकविकास केंद्र




दामाजी जावीर, कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठातील आजीवन शिक्षण व विस्तार विभाग विद्यापीठाच्या समाजाभिमुख कार्याचा महत्त्वाचा आधारस्तंभ आहे. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या संकल्पनेनुसार उच्च शिक्षणातील अध्यापन, संशोधन आणि विस्तार या त्रिसूत्रीमध्ये विस्तार कार्याला महत्त्व देण्यासाठी या विभागाची स्थापना करण्यात आली. विद्यापीठाने १९८० मध्ये प्रस्ताव सादर केल्यानंतर यूजीसीने १९८२ मध्ये मान्यता दिली आणि मार्च १९८४ मध्ये प्रौढ, निरंतर शिक्षण व विस्तार कार्य विभाग



म्हणून कार्य सुरू झाले. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ नुसार १ मार्च २०१७ पासून या विभागाचे नामकरण 'आजीवन शिक्षण व विस्तार विभाग' असे करण्यात आले.

विभागाचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे ७० हून अधिक अल्पकालीन प्रमाणपत्र अभ्यासक्रम आहेत. शिक्षण, कौशल्य आणि सामाजिक बांधिलकी यांचा प्रभावी संगम घडवून आणणारा हा विभाग विद्यापीठ आणि समाज यांच्यातील दुवा म्हणून कार्य करत आहे.

**निवासस्थानात साकारलाय समाजविकासाचा सेतू**

**बदलत्या काळातील गरजा ओळखून रोजगाराभिमुख, कौशल्याधारित, व्यक्तिमत्त्व विकासाला चालना देणारे विविध अभ्यासक्रम अनुभवी प्राध्यापक व तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली राबवले जात आहेत. शिक्षण, कौशल्य आणि समाजविकासांचा सेतू म्हणून कार्यरत आहे.**

**■ संचालक- प्रा. डॉ. आर. जी. पवार, आजीवन शिक्षण व विस्तार विभाग शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर**

## विद्यापीठ-समाजातील दुवा : लोकविकास केंद्र

विद्यापीठाच्या जुन्या निवासी क्वार्टर्समधील बी-१० नंबरच्या इमारतीत कार्यरत असलेले लोकविकास केंद्र हे विद्यापीठातील ज्ञान आणि समाजाच्या गरजा यांच्यातील दुवा म्हणून दोन दशके कार्यरत आहे. एप्रिल २००० मध्ये स्थापन झालेल्या या केंद्राने कौशल्य विकास, समुदाय विकास आणि समाजाभिमुख शिक्षणाच्या माध्यमातून हजारो युवक-युवतींना रोजगाराभिमुख प्रशिक्षणाची संधी उपलब्ध करून दिली आहे.

लोकविकास केंद्रामार्फत एक वर्ष, सहा महिने आणि



अल्पकालीन अशा तब्बल ४२ कौशल्य विकास प्रमाणपत्र अभ्यासक्रम राबवले जातात. हे अभ्यासक्रम समाजाच्या गरजेनुसार तयार केले असून स्वयंरोजगार, लघुउद्योग आणि खासगी क्षेत्रातील रोजगारासाठी उपयुक्त कौशल्ये विद्यार्थ्यांना दिली जातात.

**वंचितांसाठीचे प्रशिक्षण केंद्र**

लोकविकास केंद्र हे विद्यापीठ आणि समाज यांच्यातील महत्त्वाचा दुवा आहे. समाजाच्या गरजेनुसार कौशल्याधारित आणि रोजगाराभिमुख अभ्यासक्रम तयार करून ते कोल्हापूर, सांगली व सातारा जिल्ह्यातील विविध स्वयंसेवी संस्थांच्या सहकार्याने ग्रामीण भागात राबवले जातात. त्यामुळे युवक-युवती, महिला आणि वंचित घटकांना त्यांच्या परिसरातच प्रशिक्षण व रोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध होत आहेत.

0 3 SEP 2026

जनप्रवास

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# संशोधन समाजोपयोगी असावे : डॉ. राजाराम गुरव

**• शिवाजी विद्यापीठात कार्यशाळेचे आयोजन**



कोल्हापूर : कार्यशाळेत सहभागी शिक्षक, विद्यार्थी-विद्यार्थिनी संशोधक

**जनप्रवास : कोल्हापूर**

संशोधन केवळ पदवी संपादन किंवा शैक्षणिक प्रगतीपुरते मर्यादित न राहता समाजासाठी उपयुक्त, परिणामकारक आणि व्यवहार्य असावे. संशोधनातून निर्माण होणाऱ्या नावीन्यपूर्ण कल्पनांचे प्रत्यक्ष उत्पादनांमध्ये, सेवांमध्ये आणि समाजोपयोगी उपक्रमांमध्ये रुपांतर होणे आवश्यक आहे. तसेच संशोधनातून निर्माण होणाऱ्या कल्पना बाजारपेठेच्या गरजा पूर्ण करणाऱ्या व स्वीकारार्ह असाव्यात, अशी अपेक्षा शिवाजी विद्यापीठाच्या विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. राजाराम गुरव यांनी व्यक्त केली.

शिवाजी विद्यापीठाच्या शिक्षणशास्त्र अधिविभाग आणि संशोधन व विकास कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने पीएम-उषा अंतर्गत पदव्युत्तर विद्यार्थ्यांसाठी 'पदव्युत्तर विद्यार्थ्यांसाठी संशोधन कौशल्ये-गुणवत्तापूर्ण संशोधन आणि शैक्षणिक उत्कृष्टतेचा पाया' या विषयावर एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन केले. कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून डॉ. गुरव बोलत होते.

डॉ. गुरव म्हणाले, शिक्षण क्षेत्रातील नावीन्यपूर्ण कल्पनांचे समाजोपयोगी उत्पादनांमध्ये, सेवांमध्ये आणि उपक्रमांमध्ये रुपांतर करण्यासाठी संशोधकांनी प्रयत्नशील राहावे. संशोधनाला व्यावहारिक तसेच उद्योजकीय दृष्टिकोन देण्याची गरज असून, विद्यार्थ्यांनी केवळ संशोधन पूर्ण करण्याऐवजी त्यातून समाजाच्या प्रत्यक्ष गरजा कशा पूर्ण होतील, याचा विचार करावा, असेही आवाहन त्यांनी केले. शिक्षणशास्त्र अधिविभागाच्या प्रमुख डॉ. चेतना सोनकांबळे म्हणाल्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अनुषंगाने संशोधनाच्या बदलत्या स्वरूप लक्षात घ्यावे. संशोधन हे केवळ ज्ञाननिर्मितीपुरते मर्यादित न राहता शिक्षणाची गुणवत्ता वाढविणारे, विद्यार्थीकेंद्रित आणि समाजाच्या गरजा पूर्ण करणारे असावे. समन्वयक डॉ. विद्यानंद खंडागळे यांनी भूमिका स्पष्ट केली. डॉ. नीलिमा सप्रे, डॉ. राजेंद्र पारिजात आणि डॉ. कुंभार यांनी मार्गदर्शन केले. रुचिता थरोली यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. सुप्रिया पाटील यांनी आभार मानले.

03 SEP 2026
तरुण भारत

# 'मास मीडिया एआय' विषयावर आज कार्यशाळा

**कोल्हापूर:** मास मीडिया संशोधनातील आधुनिक साधने, तंत्रे तसेच कृत्रिम बुद्धिमत्तेचा संशोधन प्रक्रियेत प्रभावी वापर या विषयावर शिवाजी विद्यापीठाच्या संशोधन व विकास कक्ष आणि मास कम्युनिकेशन विभागाच्या वतीने आज एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन केले आहे. सकाळी १० वाजता नोंदणीने कार्यशाळेला सुरुवात होणार आहे.

सकाळी अतुल नगरकर हे 'मास मीडिया संशोधन : साधने आणि तंत्रे" या विषयावर मार्गदर्शन करणार आहेत. दुपारी वेळेत राजश्री मोरे या 'मास मीडिया संशोधनासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेची साधने' या विषयावर मार्गदर्शन करणार आहेत. पत्रकार, संशोधकांनी उपस्थित राहण्याचे आवाहन संशोधन व विकास कक्षाचे संचालक डॉ. तुकाराम डोंगळे आणि मास कम्युनिकेशन विभागाचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांनी केले आहे.

0 3 SEP 2026
पुण्यनगरी

# नवीन शैक्षणिक धोरण संशोधनवृत्ती वाढवणारे : प्रा. गायकवाड

**गारगोटी : प्रतिनिधी**

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण हे केवळ अभ्यासक्रमातील बदल नसून विद्यार्थ्यांमध्ये कृतिशील ज्ञान, संशोधनवृत्ती आणि रोजगाराभिमुख कौशल्ये निर्माण करणारी नवी दिशा आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाच्या प्राणीशास्त्र अभ्यास मंडळाचे अध्यक्ष प्रा. (डॉ.) एस. एम. गायकवाड यांनी केले.

येथील श्री मौनी विद्यापीठाच्या कर्मवीर हिरे महाविद्यालयात शिवाजी विद्यापीठ प्रायोजित नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० अंतर्गत बी.एस्सी. भाग-३ (प्राणीशास्त्र सत्र-५ व गणित सत्र-६) नवीन अभ्यासक्रम क्षमता-बांधणी प्राध्यापक प्रशिक्षण कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य प्रा. (डॉ.) यू. आर. शिंदे होते.

यावेळी प्रा. (डॉ.) के. डी. कुच्चे, प्रा. (डॉ.) एम. टी. गोफणे यांनी मार्गदर्शन केले. उपप्राचार्य डॉ. एस. बी. देसाई, डॉ. एम. एस. देसाई हे प्रमुख उपस्थित होते. प्रास्ताविक डॉ. एस. ए. व्हनाळकर, स्वागत डॉ. व्ही. ए. जगताप, सूत्रसंचालन डॉ. ऋतुजा लाड यांनी केले. आभार डॉ. एस. एस. खोपडे यांनी मानले.

03 SEP 2026

पुण्यनगरी

# विद्यापीठात उद्या लैंगिक शोषण प्रतिबंध कार्यशाळा

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रूरल डेव्हलपमेंट येथे दि. ४ व ५ सप्टेंबर रोजी 'बाल लैंगिक शोषण प्रतिबंधासाठी जनजागृती आणि समुपदेशन प्रशिक्षण' कार्यशाळेचे आयोजन केले आहे. ही कार्यशाळा प्र. संचालक डॉ. संतोष सुतार आणि समाजकार्य अभ्यासक्रमाचे समन्वयक डॉ. उमेश गडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली होणार आहे.